# सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई.

पहिला मजला, जागतिक बँक प्रकल्प इमारत, शासकीय तंत्रनिकेतन परीसर, खेरवाडी,
अलियावर जंग मार्ग, बांद्रा (पुर्व) मुंबई - ४०० ०५१ फोन नं - २६४७ ४८९२
ईमेल — jtdirrom@gmail.com Web site : www.jtderomumbai.com


---

क्र.विकामुं/तंशि/लेखा-२/२०१६/ १८६।
दिनांक : - 8 JUN 2016

प्रति,
प्राचार्य,
(अशासकीय अनुदानित महाविद्यालये/तंत्रनिकेतने)

विषय - अनुदानाच्या मुल्यनिर्धारणाबाबत...वित्तीय वर्ष २०१५-१६
संदर्भ — तंत्र शिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई ७/अनुदान/मु.नि.अहवाल/२०१६/२१८ दि. ०६.०५.२०१६

उपरोक्त विषयाबाबत संचालनालयाकडून आपल्या संस्थेस सन २०१५-१६ या वित्तीय वर्षात अनुदान वाटप करण्यात आले आहे. सदर वाटप करण्यात आलेल्या अनुदानाचे मुल्यनिर्धारण करुन त्यासंबंधीचा अहवाल संचालनालयास उपरोक्त संदर्भात पत्रानुसार सादर करण्याबाबत संचालनालयाने निर्देश दिलेले आहेत.

त्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, आपल्या संस्थेस वाटप करण्यात आलेल्या अनुदानातील खर्चाचे अंतर्गत लेखापरिक्षकाकडून नियमानुसार लेखा परिक्षण करुन त्याचा अहवाल व त्यासोबत सदर वर्षातील खर्च, उत्पन्न व प्राप्त अनुदान (विहित आदेशांच्या संदर्भासहीत) इत्यादीची माहिती मुल्यनिर्धारणासाठी विहित केलेल्या प्रपत्रात संगणकावर एक्सेलशीटस् वर टंकलिखित करुन त्याची आगाऊ प्रत या कार्यालयास दिनांक ३० जून २०१६ पर्यत सादर करण्याबाबत या पत्राव्दारे सुचित करण्यात येत आहे.

असेही निदर्शनास आले आहे की, संस्था विहित वेळेत लेखापरिक्षण केलेले ऑडिटेड स्टेटमेंट सादर करीत नाहीत, त्यामुळे मुल्यनिर्धारणाच्या कामात व्यत्यय निर्माण होतो आणि संबंधित संस्थेला वेळेवर अनुदान उपलब्ध करुन देण्यामध्येही अडचणी निर्माण होत असतात. अनुदान वितरणानंतर खर्च तपशील आणि लेखा परिक्षणाचा अहवाल या सर्व बाबी अत्यंत अचूकतेने आणि कालमर्यादेत पार पडणे आवश्यक आहे, जेणेकरुन शासनाच्या लेखा परिक्षण पथकाकडून आक्षेप येणार नाहीत. सर्व अशासकीय अनुदानित संस्थांना या पत्राव्दारे सुचित करण्यात येते की, त्यांनी वर नमुद केलेल्या दिनांकापूर्वी ऑडीटेड स्टेटमेंट या कार्यालयास पाठविण्याची दक्षता घ्यावी. अनुदान वेळेवर उपलब्ध होण्यासाठी या बाबतच्या सर्व कामकाजांची दिरंगाई टाळण्यात यावी असे अंतिमतः सुचित करण्यात येत आहे.

(प्रमोद अं. नाईक)
सहसंचालक
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई

प्रत —

१. मा. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई — यांना माहितीसाठी.
२. प्रोग्रॅमर, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई — यांना सुचित करण्यात येते की, सदरचे परिपत्रक कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे व ऑगस्ट २०१६ अखेरपर्यंत संकेतस्थळावर उपलब्ध ठेवावे.